म.शि.प्र. मंडळाचे,

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## नियीमत कार्यक्रम अहवाल

### शैक्षणिक वर्ष २०२१-२२

भारताच्या स्वातंत्र्यांचे हे अमृत महोत्सवी वर्ष आहे. तसेच म. शि. प्र. मंडळ संचलीत,यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,अंबाजोगाई जि. बिड च्या स्थापनेचे शैक्षणीक वर्ष २०२१—२२ हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या वर्षी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने महाविद्यालयात विविध उपक्रम राबवण्यात आले. त्याचा संक्षीप्त अहवाल पुढील प्रमाणे.

- **रक्तदान शिबिर :**

` दिनांक २ मे २०२१ रोजी यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत रक्तदान शिबिरात विद्यार्थ्यांना व रक्तदान करणाऱ्या सन्माननीय व्यक्तींना N95 Mask चे वाटप. आज दिनांक 2 मे 20 रोजी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद सिनेट सदस्य तथा महाराष्ट्र राज्यातील राष्ट्रवादी डॉक्टर सेलचे प्रमुख डॉ. नरेंद्र (सचिन) काळे यांच्या उपस्थितीत मान्यवरांना व रक्तदान शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत 50 N 95 Mask वाटप करण्यात आले. याप्रसंगी डॉ. नरेंद्र काळे यांनी विद्यार्थ्यांचे रक्तदान केल्याबद्दल अभिनंदन व कौतुक केले. तसेच कोरोना ने निर्माण केलेल्याराष्ट्रीय आणीबाणीच्या काळात विद्यार्थी युवक यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. "विद्यार्थ्यांच्या सहभागाने करोना विषाणू संसर्ग प्रतिबंधक मोहीम संबंधीत जागृती

मोहीम अधिक प्रभावी ठरेल" अशी आशा व्यक्त केली. याप्रसंगी एकूण 20 व्यक्तींनी रक्तदान केले. रक्तदान शिबिरासाठी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथील डॉ. प्रशांत दहीरे अधिकाऱ्यांनी जबाबदारी पार पडली. रक्तदान शिबिरास प्रमुख उपस्थिती म्हणून माजी आमदार पृथ्वीराज साठे, उपप्राचार्य प्रताप जाधव, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ इंद्रजीत भगत, NCC प्रमुख श्री रोहित पाटील, डॉ दीलीप भीसे यांची उपस्थिती होती. जागतिक पर्यावरण

- **जागतिक पर्यावरण दिन :**

दिनांक 5 जून 2021 रोजी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई राष्ट्रीय सेवा योजना विभाग आज दिनांक 5 जून 2021 यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त चाळीस झाडांची लागवड करण्यात आली कडुनिंब पिंपळ गुलमोहर अशा विविध सावली देणारी आणि ऑक्सिजनचा पुरवठा करणारी निसर्ग पोषक अशी झाडे याप्रसंगी लावण्यात आली. यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ धर्मराज तांदूळजेकर, अंतर्गत गुणवत्ता हमी विभाग प्रमुख डॉक्टर मुकुंद राजपंखे सर, भूगोल विभागातील प्राध्यापक दिलीप कांबळे सर, संरक्षण शास्त्र विभाग प्रमुख शैलेश जाधव, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ इंद्रजीत भगत तसेच सुर्यकांत घाडगे, गोरख उजगरे, काकूळदे, दीपक घाडगे, शेख खाजा शेख खालेख यांचे कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉक्टर धर्मराज तांदूळजेकर सर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना वृक्षारोपणाचे महत्त्व सांगितले तसेच भावी पिढीला जगण्याचा आधार देणारे काम आज आपण करत आहोत म्हणून सर्वांचे याप्रसंगी कौतुक केले. डॉक्टर मुकुंद राजपंखे यांनी याप्रसंगी पर्यावरणावर आपल्या गजलेतील चार ओळी सादर केल्या– "अंकुर पोसा आमचा नारा, कवळया चोचीन साठी चारा, चैतन्याचे तोरण येऊ, तुमच्या दारा आमुच्या दारा." कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक शैलेश जाधव यांनी केले तर कार्यक्रमाचे

प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉक्टर इंद्रजीत भगत यांनी केले, कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राध्यापक दिलीप कांबळे यांनी केले.

- **पर्यावरण मित्र स्पर्धा :**

५ जून२०२१ म्हणजेच जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता पर्यावरण मित्र ही स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे या स्पर्धेमध्ये एक जून ते 5 जून या कालावधीमध्ये किमान दोन झाडे लावून त्यांचे संगोपन करावे व पर्यावरण संरक्षण व समतोल राखण्यास सहकार्य करावे. एक जून ते 15 जून या दरम्यान जी विद्यार्थी किमान तीन झाडे लावत असतील त्यांनी आपले वृक्षारोपणाचे फोटो एनएसएस विभागाच्या ग्रुप वर किंवा एनएसएस कार्यक्रम अधिकाऱ्यांना शेअर करावे. विद्यार्थी सर्वाधिक झाडे लावून त्यांचे सर्वात जास्त चांगल्या रित्या संगोपन करेल त्या विद्यार्थ्यास पर्यावरण मित्र पुरस्काराने NSS यशवंतराव चव्हाण महाविद्यालयामार्फत सन्मानपत्र देऊन विशेष कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येईल. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत आपला सहभाग नोंदवावा....राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. अनंत मरकाळे, डॉ इंद्रजीत भगत.

- **शिवस्वराज्य दिन :**

दिनांक 6 जून 2021 रोजी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ धर्मराज तांदुळजेकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दिलीप भिसे सर हे उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य शिंदे सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. "शिवराय हे आधुनिक काळात युवकांना प्रेरणादायी व्यक्तीमत्व आहेत. भविष्यातील नवयुवकांना शिवरायांचा आदर्श घेणे ही काळाची गरज आहे." असे उपप्राचार्य रमेश शिंदे यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. उपप्राचार्य प्रताप जाधव सर डॉक्टर मुकुंद राजपंखे सर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ इंद्रजीत भगत सर,

कार्यालय अधीक्षक श्री सतीश एरंडे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती, तर विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिवस्वराज्य दिन साजरा करण्यास आव्हान केले गेले होते. शिवस्वराज्य दिनानिमित्त महाविद्यालयात शिवाजी महाराजांना मानवंदना, पूजन करण्यात आले, राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र राज्य गीत गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी वड पिंपळ गुलमोहर निंब इत्यादी झाडांना महाविद्यालयीन परिसरात लागवड करण्यात आली. एकूण 50 झाडे याप्रसंगी लावण्यात आली. या कार्यक्रमाकरिता सामाजिक वनीकरण विभाग अंबाजोगाई यांच्या सहकार्याने झाडांची उपलब्धता महाविद्यालयास झाली त्याकरिता सामाजिक वनीकरण विभागाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ इंद्रजीत भगत यांनी आभार व्यक्त केले.

म शि प्र मंडळाचे, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई राष्ट्रीय सेवा योजना विभागआज दिनांक 10 जून 2021 रोजी महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छता आणि वृक्षारोपण कार्य पार पाडले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ इंद्रजीत भगत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ धर्मराज तांदूळजेकर यांनी परिसरात किमान नवीन एक हजार झाडे या पावसाळी मोसमात लावण्याचा संकल्प विद्यार्थ्यांना दिला. त्यानुसार विद्यार्थ्यांनी टप्प्याटप्प्याने वृक्षारोपण करणे अपेक्षित आहे. आज भारतीय व प्रदेशात आढळणारी वड पिंपळ आणि कडूनिंब अशा ३० झाडांचे वृक्षारोपण राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी केले.

प्रभारी प्राचार्य डॉ. धर्मराज तांदूळजेकर यांनी दिलेला एक हजार वृक्षरोपणाचा संकल्प घेऊन आज दिनांक 11 जून 2021 रोजी महाविद्यालय परिसरात 50 (पन्नास) झाडांची लागवड करण्यात आली. याप्रसंगी पदवीधर आमदार माननीय सतीश भानुदासराव चव्हाण (सरचिटणीस, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ औरंगाबाद)

यांनी महाविद्यालय परिसरात वडाचे झाड लावून कार्यक्रमाची सुरुवात केली. कडुनिंब पिंपळ वड आणि जांभूळ ही झाडे विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या सभोवतालच्या परिसरामध्ये लागवड केली. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. इंद्रजीत भगत यांनी रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. करोना विषाणू संसर्ग परिस्थितीमध्ये रोज काही निवडक स्वयंसेवक महाविद्यालयातील वृक्षारोपणाचा कार्यक्रम करीत आहे. वृक्षारोपणासाठी जबाबदारीने सहकार्य करणाऱ्या स्वयंसेवकाचे याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धर्मराज तांदूळकर उपप्राचार्य डॉ. रमेश शिंदे सर, जाधव सर आणि कार्यालय अधीक्षक सतीश एरंडे सर यांनी कौतुक केले.

- **आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रम :**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन आंतरराष्ट्रीय योग दिन 21 जून 2021 सकाळी 6:30 संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य, डॉ. धर्मराज तांदुळजेकर हे होते. तर मार्गदर्शक क्रीडा विभाग प्रमुख प्रा. जगन्नाथ तत्तापुरे हे होते. प्रा. जगन्नाथ तत्तापुरे यांनी योगाचे महत्व सांगून विविध योग आसनांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व नागरिक ऑनलाईन उपस्थित होते. कार्यक्रमाची लिंक https://youtu.be/uabvgiyPlNg

- **सुंदर माझे कार्यालय मदत कक्ष :**

विविध शासकीय योजनांची माहिती विद्यार्थ्यांना देऊन विद्यार्थ्यांन मार्फत संबंधित शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांना ही माहिती देण्यासाठी तहसील कार्यालयात मदत कक्ष स्थापन करण्यात आला. त्या मदत कक्षाचे उद्घाटन दि. ९.७.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता झाले. या मदत कक्षात आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकानी व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. इंद्रजित भगत व डॉ अनंत मरकाळे यांनी सहभाग घेतला.

- **आरोग्य तपासणी शिबीर :**

२९ जुलै २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग मार्फत महाविध्यालयात मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. ALOE HEALTH CARE आणि FREE BODY CHECK UP CENTER PUNE यांचे संयुक्त विध्यामाने हे शिबीर आयोजित केले गेले. या शिबिरात डॉ फारूख शेख यांनी कर्मचारी आणि विध्यार्थी यांची शारीरिक तपासणी करून तसे प्रमाणपत्र दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ धर्मराज तंदुल्जेकर होते. या प्रसंगी ६४ विध्यार्थी आणि ४१ कर्मचार्यांनी कोविड नियमांचे पालन करून आरोग्य तपासणीत सहभाग नोंदविला.

- **राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन :**

दिनांक २४.९.२०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन साजरा करण्यात आला. महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धर्मराज तांदूळजेकर अध्यक्ष होते. तर मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ दिलीप भिसे हे होते. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्थापन करण्या मागचा इतिहास सागितला. प्राचार्य डॉ. धर्मराज तांदूळजेकर यांनी राष्ट्रीय सेवा योजना माणूस घडवण्याचे कार्य करते असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. इंद्रजीत भगत यांनी केले. तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनंत मरकाळे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी उपस्थित उपस्थित होते.

- **पोषण महा :**

दिनांक २८ सप्टेंबर २०२१ मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई राष्ट्रीय सेवा योजना व IQAC विभागाच्यावतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सव व पोषण महानिमित्त दिनांक २८ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी ११.३०वाजता zoom App च्या माध्यमातून ऑनलाईन व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी

प्राचार्य, डॉ. धर्मराज तांदुळजेकर हे होते. तर व्याख्याते प्रा. डॉ. प्रशांत दहिरे सहाय्यक प्राध्यापक स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई यांनी आहार आणि आरोग्य या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. जास्त प्रक्रिया केलेले अन्न आरोग्यास घातक आहे असे त्यांनी सांगितले. कोणत अन्न खाल्ल पाहिजे व कोणत अन्न खाऊ नये या विषयावर त्यांनी सविस्तर माहिती दिली. तसेच आरोग्याची चातुर्सुत्री सांगितली. अध्यक्षीय समारोप करतांना प्रभारी प्राचार्य, डॉ. धर्मराज तांदुळजेकर यांनी लठ्ठपणाची कारणे व त्यावर उपाय याविषयी सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमात उपप्राचार्य, डॉ. रमेश शिंदे, उपप्राचार्य प्रा. पी. के जाधव, IQAC Cordinatator डॉ. मुकुंद राजपंखे, उपप्राचार्य, प्रा. हनूमंत कलबुर्गे कार्यालय अधीक्षक, श्री सतीश एरंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे संयोजक प्रा. डॉ. अनंत मरकाळे, प्रा. डॉ. इंद्रजीत भगत हे होते. तर या कार्यक्रमास तांत्रीक सहाय्य श्री शेख आसेफ यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व नागरिक ऑनलाईन उपस्थित होते.

- **महात्मा गांधी जयंती :**

दिनांक २.१०.२०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धर्मराज तांदूळजेकर अध्यक्ष होते. या कार्यक्रमात मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ धनंजय खेबडे हे होते. प्रा. डॉ धनंजय खेबडे यांनी महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. धर्मराज तांदूळजेकर यांनी महात्मा गांधी हे राजकारणातील संत होते असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनंत मरकाळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. इंद्रजीत

भगत यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी उपस्थित उपस्थित होते.

- **स्वच्छता अभियान:**

दिनांक १२.१०.२०२१ रोजी म शि प्र मंडळाचे, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई राष्ट्रीय सेवा योजना विभाग आझादीका अमृत महोत्सवानिमित्त महाविद्यालयात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी स्वयंसेवकांनी परिसर स्वच्छता केली. सुरूवातीला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ धर्मराज तांदूळजेकर यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व सांगितले. यावेळी श्री एम. ए. साळुंके केंद्र प्रमुख बेसीक केंद्र अंबाजोगाई, श्री गिरीश पुजारी उपशिक्षणाधिकारी बीड हे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ इंद्रजीत भगत, प्रा डॉ अनंत मरकाळे यांनी कार्य केले.

- **कु. सना शेखची प्रजासत्ताक दिन रा.से.यो. राष्ट्रीय पथसंचालन पूर्वशिबिरा करिता निवड :**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे 12 ते 21 ऑक्टोबर या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या प्रजासत्ताक दिन पथसंचालन पुर्वशिबिर करिता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या अंतर्गत येणाऱ्या चार जिल्ह्यांमधून सात राष्ट्रीय सेवा स्वयंसेवक यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या सात स्वयंसेवकांनी मध्ये सहा स्वयंसेवक हे औरंगाबाद जिल्ह्याचे असून बीड जिल्ह्यातील एकमेव स्वयंसेवक कु. सना शेख यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथील विद्यार्थिनी आहे. कु. सना शेख ही यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथे विज्ञान शाखेत तृतीय वर्ष पदवीचे शिक्षण घेत असुन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विविध उपक्रमात तिने सहभाग नोंदविला आहे. प्रजासत्ताक दिन शिबिरा करिता राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत कु सना शेख यांचे नाव सुचविल्या नंतर तिने पहिल्यांदा बीड जिल्हा येथे शिबिरात चाचणी दिली त्यानंतर औरंगाबाद येथे

तिची निवड करण्यात आली व आता तिला एन आर डी शिबिरा करिता जळगाव येथे प्रतिनिधित्व मिळाले आहेत. दिनांक12 ऑक्टोबर 2021रोजी माननीय कुलगुरू डॉ प्रमोद येवले तसेच राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ टी आर पाटील यांनी आपल्या शुभेच्छा सह सात सदस्यीय टिमला जळगाव विद्यापीठ येथे रवाना केले. तिच्या या यशस्वी वाटचाली करिता राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख डॉ इंद्रजित भगत व डॉ अनंत मरकाळे यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी 'मेहनतीच्या आणि जिद्दीच्या जोरावर सना शेख हिने आपली स्वप्ने साकार केली तिची वाटचाल प्रेरणादायी आहे.' असे प्राचार्य डॉ धर्मराज तांदूळजेकर यांनी कौतुक केले. बीड जिल्ह्याची कन्या कु. सना शेखला महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी या प्रसंगी शुभेच्छा दिल्या.

- **कोविड प्रतिबंधक लसीकरण शिबिर :**

दिनांक २७ ऑक्टोबर २०२१ रोजी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने कोविड प्रतिबंधक लसीकरण शिबिर संपन्न झाले. या लसीकरण शिबिरात 25 व्यक्तींना लसीकरण करण्यात आले. या शिबिरासाठी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथील वैद्यकीय पथक आले होते. त्यामध्ये श्रीमती आशा अडसूळ, श्रीमती ज्योती वसंत बनसोडे व नदीम खान बशीर खान हे कर्तव्यावर होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धर्मराज तांदूळजेकर यांच्या हस्ते वैद्यकीय पथकातील सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. अनंत मरकाळे यांनी प्रास्ताविकात हे शिबिर घेण्यामागची आपली भूमिका मांडली. यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्राचार्य डॉ. धर्मराज तांदूळकर यांनी कोविड प्रतिबंधक लसी चे महत्व सांगितले. तसेच 18 वर्षावरील सर्वांनी लस घ्यावी. आपल्या कुटुंबातील व परिचयाच्या १८ वर्षा वरील सर्व नागरिकांना कोविड प्रतिबंधक लस घेण्यासाठी जागृत करण्याचे आव्हान केले. या कार्यक्रमाचे आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ. इंद्रजीत भगत यांनी केले. यावेळी

उपप्राचार्य, डॉ. रमेश शिंदे, उपप्राचार्य प्रा. पी. के जाधव, अंतर्गत गुणवत्ता व हमी विभाग प्रमुख डॉ. मुकुंद राजपंखे, उपप्राचार्य, प्रा. हनूमंत कलबुर्गे, कार्यालय अधीक्षक, श्री सतीश एरंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे संयोजक प्रा. डॉ. अनंत मरकाळे, प्रा. डॉ. इंद्रजीत भगत हे होते. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

- **स्वच्छता अभियान:**

दि. १७.११.२०२१ रोजी यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ इंद्रजीत भगत, प्रा डॉ अनंत मरकाळे यांनी कार्य केले.

- **माझी वसुंधरा अभियान :**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथे माझी वसुंधरा अभियान राबविण्यात आले. या अभियानाची सुरुवात ई शपथ घेऊन करण्यात आली. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या १५० स्वयंसेवकांनी ई शपथ घेतली. तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने चाळीस झाडांची लागवड करण्यात आली कडुनिंब पिंपळ गुलमोहर अशा विविध सावली देणारी आणि ऑक्सिजनचा पुरवठा करणारी निसर्ग पोषक अशी झाडे याप्रसंगी लावण्यात आली. यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ धर्मराज तांदूळजेकर, अंतर्गत गुणवत्ता हमी विभाग प्रमुख डॉक्टर मुकुंद राजपंखे सर, भूगोल विभागातील प्राध्यापक दिलीप कांबळे सर, संरक्षण शास्त्र विभाग प्रमुख शैलेश जाधव, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ इंद्रजीत भगत तसेच सुर्यकांत घाडगे, गोरख उजगरे, काकूळदे, दीपक घाडगे, शेख खाजा शेख खालेख यांचे कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉक्टर धर्मराज तांदूळजेकर सर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना वृक्षारोपणाचे महत्त्व सांगितले. तसेच भावी पिढीला जगण्याचा आधार

देणारे काम आज आपण करत आहोत. म्हणून सर्वांचे याप्रसंगी कौतुक केले. डॉक्टर मुकुंद राजपंखे यांनी याप्रसंगी पर्यावरणावर आपल्या गजलेतील चार ओळी सादर केल्या– "अंकुर पोसा आमचा नारा, कवळया चोचीन साठी चारा, चैतन्याचे तोरण येऊ, तुमच्या दारा आमुच्या दारा." कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक शैलेश जाधव यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉक्टर इंद्रजीत भगत यांनी केले, कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राध्यापक दिलीप कांबळे यांनी केले.

- **माझी वसुंधरा अभियान कार्यशाळा बीड :**

दि १६.११.२०२१ रोजी के. एस. महाविद्यालयात बीड येथे माझी वसुंधरा अभियान कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विस स्वयंसेवक सहभागी झाले होते.

- **संविधान दिन**:

दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ रोजी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. नरेंद्र काळे व महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. धर्मराज तांदूळजेकर यांच्या हस्ते डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. दिलीप भिसे यांनी संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामुहिक वाचन केले. यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्राचार्य डॉ. धर्मराज तांदूळकर यांनी विध्यार्थ्यांना साविधानाचे महत्व सांगितले. या कार्यक्रमाचे आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ. इंद्रजीत भगत यांनी केले. यावेळी उपप्राचार्य, डॉ. रमेश शिंदे, उपप्राचार्य प्रा. पी. के जाधव, अंतर्गत गुणवत्ता व हमी विभाग प्रमुख डॉ. मुकुंद राजपंखे, उपप्राचार्य, प्रा. हनूमंत कलबुर्गे, कार्यालय अधीक्षक, श्री सतीश एरंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे संयोजक प्रा. डॉ. अनंत मरकाळे, प्रा. डॉ. इंद्रजीत भगत हे होते. या

कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

- **मतदार जागृती अभियान :**

मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन करण्यात आले. या निवडणूक साक्षरता मंडळाच्या माध्यमातून मतदार जागृती अभियान राबवण्यात आले.

म. शि. प्र. मंडळाचे

**यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई जिल्हा बीड**

सुवर्ण मोहत्सवी वर्ष २०२१-२२

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

निवडणूक साक्षरता मंडळ

NSS स्वयंसेवक पदाधिकारी

दिनांक १.११.२०२१

| अनु क्र. | **NSS स्वयंसेवक पदाधिकारी** | पद | मोबाईल नं. |
|---|---|---|---|
| १. | कु ऋतुजा नितीन पाटील | अध्यक्ष | ८२६१८०३८६४ |
| | खुशाल भागवत कांबळे | उपाध्यक्ष | ८४५९७७४७४७ |
| | थोरात अमृता नंदकुमार | सचिव | ८०८०७०३३८३ |
| | वैभव दिलीप बनसोडे | कोषाध्यक्ष | ९१५६७६१२०८ |
| | ऋषिकेश रंगनाथ कडभाने | जनसंपर्क पदाधिकारी | ८४५९७५७५५७ |
| | विशाल कमलाकर अरसूळ | सोशल मेडिया प्रमुख | ८००७८४५७०६ |
| | प्रतिक्ष विजय मस्के | सदस्य | ७८२०८५१५५२ |
| | नम्रता विकास सातपुते | सदस्य | ७७१९०८७२९६ |

- **मतदार नोंदणी शिबिर :**

दिनांक १ नोव्हेंबर २०२१ ते ३० नोव्हेंबर २०२१ रोजी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने मतदार नोंदणी शिबिर संपन्न झाले. या शिबिरात २१ मतदारांची नोंदणी करण्यात आले. शिबिरामध्ये २७ नोव्हेंबर २०२१ रोजी मतदार नोंदणी जागृती करण्यात आली. या शिबिरासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धर्मराज तांदूळजेकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. इंद्रजीत भगत, डॉ. अनंत मरकाळे यांनी कार्य केले. डॉ. अनंत मरकाळे यांनी प्रास्ताविकात हे शिबिर घेण्यामागची आपली भूमिका मांडली. यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्राचार्य डॉ. धर्मराज तांदूळकर यांनी मतदार नोंदणीचे महत्व सांगितले. तसेच आपल्या कुटुंबातील व परिचयाच्या १८ वर्षा वरील सर्व नागरिकांना मतदार नोंदणी करण्यासाठी जागृत करण्याचे आव्हान केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने निवडणूक साक्षरता क्लब स्थापन करण्यात आला. या निवडणूक साक्षरता क्लबच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांध्ये निवडणूक साक्षरता करण्यात आली. या कार्यक्रमाचे संयोजक प्रा. डॉ. अनंत मरकाळे, प्रा. डॉ. इंद्रजीत भगत हे होते.

- **मतदार जागृती अभियान अंतर्गत रांगोळी स्पर्धेचे आयोजन:**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई, दिनांक 8 जानेवारी 2022 राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित मतदार जागृती अभियान अंतर्गत रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ शिवदास शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती होती तर श्री प्रताप जाधव सर (उपप्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय) तसेच श्री. शैलेश जाधव सर ( संरक्षणशास्त्र) यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. परीक्षक म्हणून श्रीमती देशमुख मॅडम (गृह विज्ञान विभाग) व श्रीमती पाटील मॅडम (विज्ञान विभाग) यांनी कार्य केले. रांगोळी स्पर्धेत एकूण 18 स्पर्धकांनी आपली रांगोळी सादर केली ज्या माध्यमातून त्यांनी मतदार जागृती संदर्भात

आपल्या रांगोळीतून संदेश दिला. कार्यक्रमाधिकारी डॉ इंद्रजित रामदास भगत (वाणिज्य शाखा प्रमुख) व डॉ अनंत दादाराव मरकाळे (इतिहास विभाग प्रमुख) यांनी याप्रसंगी मतदार जागृती अभियान अंतर्गत होणाऱ्या विविध स्पर्धांची माहिती दिली. याप्रसंगी डॉ मुकुंद राजपंखे (महाविद्यालय IQAC समन्वयक तथा इंग्रजी विभाग प्रमुख) व श्री प्रशांत जगताप यांची विशेष उपस्थिती होती.

- **कु. ह्लितिका गीरी मतदान जागृती अभियान गीत गायन स्पर्धेत विद्यापीठात तृतीय :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मतदार जागृती अभियाना अंतर्गत मतदारांमध्ये मतदानाविषयी जागृती करण्यासाठी गीत गायन स्पर्धा घेण्यात आली होती. त्या स्पर्धेत आपल्या मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाईच्या सेवा योजना विभागाची स्वयंसेविका कु. ह्लितिका गीरी हिने औरंगाबाद विभागातून तृतीय क्रमांक प्राप्त केला. तिला एक हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या यशाबद्दल तिचे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव आमदार श्री सतीश भाऊ चव्हाण, अध्यक्ष आमदार श्री प्रकाश दादा सोळंके, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य माननीय श्री दत्ता आबा पाटील, यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या विकास समितीचे प्रमुख श्री रमेशराव आडसकर तसेच यशवंतराव चव्हाण महाविद्यालय विकास समिती सदस्य डॉ. नरेंद्र काळे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. इंद्रजीत भगत व डॉ. अनंत मरकाळे यांनी अभिनंदन केले.

- **जागतिक एड्स दिन :**

दिनांक १ डिसेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने जागतिक एड्स दिन संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धर्मराज तांदूळजेकर अध्यक्ष होते. या कार्यक्रमात मार्गदर्शक म्हणून प्रा. अरविंद घोडके हे होते.

त्यांनी समाजात एड्स रोगाविषयी जागृती करण्यासाठी आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. सुरुवातीला डॉ. अनंत मरकाळे यांनी प्रास्ताविकात हा कार्यक्रम घेण्यामागची आपली भूमिका मांडली. यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्राचार्य डॉ. धर्मराज तांदूळकर यांनी एड्स रोगाची माहिती सांगितले. एड्स रोगाविषयी जागृती करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने रेड रिबन क्लब स्थापन करण्यात आला. या रेड रिबन क्लबच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांध्ये एड्स रोगाविषयी जागृतता करण्यात आली. या कार्यक्रमाचे संयोजक प्रा. डॉ. अनंत मरकाळे, प्रा. डॉ. इंद्रजीत भगत हे होते.

म. शि. प्र. मंडळाचे

**यशवंतराव चव्हाण महाविध्यालय अंबाजोगाई जिल्हा बीड**

सुवर्ण मोहत्सवी वर्ष २०२१-२२

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

रेड रिबन क्लब

दिनांक १ डिसेंबर २०२१

| अनु क्र. | **NSS स्वयंसेवक पदाधिकारी** | पद | मोबाईल नं. |
|---|---|---|---|
| 1. | ऋषिकेश रंगनाथ कडभाने | अध्यक्ष | ८४५९७५७५५७ |
| 2. | विशाल कमलाकर अरसूळ | उपाध्यक्ष | ८००७८४५७०६ |
| 3. | प्रतिक्ष विजय मस्के | सचिव | ७८२०८५१५५२ |
| 4. | वैभव दिलीप बनसोडे | कोषाध्यक्ष | ९१५६७६१२०८ |
| 5. | कु ऋतुजा नितीन पाटील | जनसंपर्क पदाधिकारी | ८२६१८०३८६४ |
| 6. | खुशाल भागवत कांबळे | सोशल मेडिया प्रमुख | ८४५९७७४७४७ |
| 7. | नम्रता विकास सातपुते | सदस्य | ७७१९०८७२९६ |
| 8. | थोरात अमृता नंदकुमार | सदस्य | ८०८०७०३३८३ |

- **आझादी का अमृत महोत्सव निबंध स्पर्धा :**

महाराष्ट्र शासनाने आझादी का अमृत महोत्सव या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित केली होती. त्यामध्ये मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण

महाविद्यालय अंबाजोगाई राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दिनांक २०.१२.२०२१ रोजी या स्पर्धेत महाविद्यालयातील ९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. आपले निबंध पाठवले होते.

- **राष्ट्रीय युवक दिन :**

२१ जानेवारी २०२२ रोजी राष्ट्रीय युवा दिन साजरा केला जातो. राष्ट्रीय युवा दिन हा भारतातील तरुणांना समर्पित केलेला एक विशेष दिवस आहे, ज्यांच्याकडे देशाचे भविष्य चांगले आणि निरोगी बनवण्याची क्षमता आहे. 12 जानेवारीला भारतीय युवा दिन साजरा करण्यामागे एक खास कारण आहे. या दिवशी स्वामी विवेकानंद यांचा जन्म झाला. 12 जानेवारीला स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त देशात दरवर्षी राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो. स्वामी विवेकानंदांचा तरुणांशी अतिशय जवळचा संबंध आहे म्हणून त्यांचा जन्मदिवस "राष्ट्रीय युवा दिन" म्हणून साजरा केला जातो. सकाळी 11:00 वाजता भारताचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी तरुणांशी ऑनलाइन संवाद साधताना म्हटले की, भारत तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. स्वामी विवेकानंद हे तरुणांसाठी नेहमीच प्रेरणास्थान राहिले आहेत. ते भारतीय तत्त्वज्ञ आणि सुधारक होते. ते धार्मिक सहिष्णुतेचा उपदेश करण्यासाठी आणि भारतीय अध्यात्माला पाश्चात्य भौतिक प्रगतीशी जोडण्यासाठी देखील ओळखले जात होते. १९८४ मध्ये, भारत सरकारने १२ जानेवारी हा राष्ट्रीय युवा दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. यामागे महत्वाचे कारण आहे. तरुणांच्या शाश्वत उर्जेला जागृत करण्याचा आणि प्रेरित करण्याचा हा एक उत्तम मार्ग आहे, परिणामी संपूर्ण देशाची समृद्धी होईल असा देशाला विश्वास आहे. स्वामी विवेकानंदांना प्रत्येक मुलामध्ये देशासाठी आशेचा किरण दिसला. कारण मुले आणि तरुण 'लोखंडी स्नायू' आणि 'पोलादी नसां'द्वारे सामाजिक बदल घडवून आणू शकतात असा त्यांचा विश्वास होता. असेच सविस्तर मार्गदर्शन त्यांनी या प्रसंगी केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ. शिवदास शिरसाठ यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. इंद्रजीत भगत यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक करताना कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करताना सांगितले की, 'राष्ट्रीय युवा दिन कार्यक्रमानिमित्त भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांचा ऑनलाईन संवाद उपक्रमात रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला असून राष्ट्रीय युवा दिनानिमित्त ऑनलाइन व्याख्यान देखील आयोजन करण्यात आलेले आहे.

कार्यक्रम प्रसंगी सन्माननीय प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ मा साहेबांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद यांना अभिवादन करण्यात आले. प्रमुख पाहुणे डॉ संजय सुरेवाड यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती आणि राष्ट्रीय युवा दिनानिमित्त मार्गदर्शन करताना सांगितले की, "राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्यांची व कर्तृत्वाची जाणीव आजच्या युवक-युवतींनी घेतली पाहिजे." असे सोदाहरण मार्गदर्शन त्यांनी याप्रसंगी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार रासेयो कार्यक्रमाधिकारी व दिनविशेष समिती प्रमुख डॉ आनंद परकाळे यांनी केले. या कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक हजर होते. संपूर्ण कार्यक्रम झूमच्या व्यासपीठावर ऑनलाईन घेण्यात आला होता.

- **ई कचरा आणि सेंद्रिय कचरा व्यवस्थापन कार्यशाळा :**

दि. १० फेब्रुवारी २०२२ रोजी यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग वतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता ई कचरा आणि सेंद्रिय कचरा व्यवस्थापन या विषयावर आभासी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ शिवदास शिरसाठ तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ अनिल नरसिंगे सूक्ष्मजीवशास्त्र विभाग योगेश्वरी महाविद्यालय अंबाजोगाई यांची उपस्थिती होती. डॉ

अनिल नरसिंगे यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक कचरा आणि सेंद्रिय कचरा या विषयी सविस्तर माहिती देऊन त्याच्या व्यवस्थापनाविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा केली. आभासी कार्यशाळेत एकूण 66 विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली व चर्चेत सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे आयोजक डॉ अनंत मरकाळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला तर डॉ इंद्रजीत भगत (कार्यक्रमाधिकारी राष्ट्रीय सेवा योजना) यांनी या प्रसंगी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.

- **मराठी भाषा संवर्धन पंधरवडा :**

दिनांक १५ फेब्रुवारी २०२२ रोजी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त प्रसिद्ध साहित्यिक डॉ. सुरेश पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष राष्ट्रीय छात्र सेना विभाग प्रमुख प्रा. रोहित पाटील हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. अनंत मरकाळे यांनी दिला. डॉ. सुरेश पाटील सर यांनी आपल्या शैलीत विद्यार्थ्यांशी संवाद साधून मराठी भाषेचे सौंदर्य उलगडून दाखविले. ते म्हणाले की, कोणतीच भाषा श्रेष्ठ नाही वा कनिष्ठ नाही. आपली मातृभाषा आपल्यासाठी श्रेष्ठ आहे. मराठी अभिजात भाषा आहे. महाराष्ट्रात वेगवेगळया भागात बोलली जाणारी बोली भाषा ही त्या भाषेचे वेगवेगळे स्वरूप आहेत. या बोली भाषा मुळेच मराठी भाषा समृद्ध होते. त्याचबरोबर डॉ. सुरेश पाटील यांनी आपली निरोप समारंभ नावाची कथा सादर केली. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्रा. रोहित पाटील यांनी मायबोली मराठीचे विविध रूप उलगडून दाखवले. तसेच मराठी भाषा ही श्रेष्ठ भाषा आहे असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. इंद्रजीत भगत यांनी केले. यावेळी मंचावर प्रा. श्रीपाद कदम उपस्थित होते. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

- **जल पे चर्चा :**

महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान आंबेजोगाई यांचे वतीने उद्या दिनांक १३ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी ३ वाजता मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथील विद्यार्थ्यांसाठी *जल पे चर्चा हा कार्यक्रम zoom मीटिंग द्वारेआयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमामध्ये पाण्याचे व्यवस्थापन, पाण्याचा चक्रीय वापर, शोष खड्डे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

Join Zoom Meeting

https://us05web.zoom.us/j/81863706263?pwd=ZHFJc3owcEs5VllWbzFrOExTU0xNUT09 Meeting ID: 818 6370 6263

Passcode: Yt4iGm

- **लोकशाही आणि महिलांचे स्वातंत्र्य व्याख्यान:**

दिनांक १६ फेब्रुवारी २०२२ रोजी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने लोकशाही आणि महिलांचे स्वातंत्र्य या विषयावर श्रीमती रुखसाना मैनोद्दीन मुल्ला राज्य महिला कार्यवाह महाराष्ट्र अंधकारद्धा निर्मूलन समित यांचे ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ हे होते. श्रीमती रुखसाना मुल्ला यांनी मार्गदर्शन करतांना महिलांच्या विकासासाठी लोकशाही कशी महत्वाची आहे. हे सांगुन महिला सक्षमीकरण करण्यासाठी कायदेविषयक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ शिवदास शिरसाठ यांनी महिला सक्षमीकरण करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या पातळीवर कार्य करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. इंद्रजीत भगत यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी ऑनलाईन उपस्थित उपस्थित होते.

- **अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रम :**

दि. २३ फेब्रुवारी २०२२ रोजी यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त अंधश्रद्धा निर्मूलन याविषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रा डॉ अनंत मरकाळे हे मार्गदर्शक होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ शिवदास शिरसाठ हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर डॉ अनंत मरकाळे यांनी संत गाडगेबाबा यांनी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी केलेल्या कार्याची माहिती दिली. समाजाच्या विकासासाठी अंधश्रद्धा निर्मूलन काळाची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ शिवदास शिरसाठ यांनी संत गाडगेबाबा यांच्या कृतीशील कार्याची ओळख करून दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ सुरेवाड यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. प्रशांत जगताप यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

- **विद्यार्थ्यांना मास्क वाटप :**

दिनांक २७ फेब्रुवारी २०२२ रोजी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई राष्ट्रीय सेवा योजना विभाग, मानिनी फाऊंडेशन पिंपरी चिंचवड पुणे व विश्व ग्रामीण विकास सेवाभावी संस्था मुरुड अंबाजोगाई, जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत मास्क वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिवदास शिरसाठ, उपप्राचार्य प्रा डॉ रमेश शिंदे, प्रा डॉ. धर्मराज तांदुळजेकर, प्रा डॉ. अहिल्या बरूरे, प्रा डॉ अनंत मरकाळे, प्रा शैलेश जाधव, प्रा. प्रशांत जगताप, प्रा डॉ रोहिणी खंदारे इत्यादी प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनंत मरकाळे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी उपस्थित उपस्थित होते.

- **मुकुंदराज मंदिर परिसर स्वच्छता अभियान :**

दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ रोजी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मुकुंदराज मंदिर परिसर अंबाजोगाई जि. बीड येथे स्वच्छता अभियान आयोजित केले होते. या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी व राष्ट्रीय छात्र सेनेच्या छात्रांनी मुकुंदराज मंदिर परिसराची स्वच्छता केली.

या स्वच्छता अभियानाच्या वेळी प्रा. डॉ. धर्मराज तांदुळजेकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ अनंत मरकाळे, राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रमुख प्रा रोहित पाटील इत्यादी प्राध्यापक उपस्थित होते. यावेळी मुकुंदराज मंदिरातील महाराज मंडळी उपस्थित होते. मुकुंदराज मंदिराचे व्यवस्थापक ह. भ. प. पवार महाराज यांनी स्वच्छता अभियान राबविल्याबद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रमानंतर सर्वांना अल्प उपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

- **जागतिक महिला दिन :**

दि. 08 मार्च 2022 रोजी यशवंतराव चव्हाण महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत जागतिक महिला दिनानिमित्त विद्यार्थीनी मेळावा तसेच नारीशक्ती गीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण चार विद्यार्थिनींनी महिलांच्या सामर्थ्यावर गीत गायन केले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांचे गट तयार करून त्यांना देशातील विविध क्षेत्रातील यशस्वी महिलांशी संबंधित माहिती गोळा करून सादर करण्याचे कौशल्य पूर्ण उपक्रम घेण्यात आला. कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी डॉ इंद्रजित रामदास भगत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक प्रमुख विद्यार्थिनी कु वैष्णवी लढ्ढा यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ शिवदास शिरसाठ

यांनी सर्व विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास एकूण 64 विद्यार्थी स्वयंसेवक हजर होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय सेवा योजना लक्ष गीताने तर समारोप राष्ट्रगीताने झाला.

- **पोषण पखवाडा :**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई, गृह विज्ञान विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने २१ मार्च तस ४ एप्रिल २०२२ य दरम्यान पोषण पखवाडा आयोजित करण्यात आला होता. या निमित्त दि. २८.३.२०२२ रोजी पोषना विषयी जागुती करणारी पोस्टर प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या गृह विज्ञान विभाग प्रमुख प्रा कल्पना देशमुख होत्या. तसेच मंचावर यावेळी प्रा डॉ राजाभाऊ भगत होते. प्रा कल्पना देशमुख यांनी मार्गदर्शन करतांना सदृढ शरीरासाठी आरोग्याचे महत्व याविषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनंत मरकाळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. इंद्रजीत भगत यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी उपस्थित उपस्थित होते.

कार्यक्रम अधिकारी                    कार्यक्रम अधिकारी                    प्राचार्य

म.शि.प्र. मंडळाचे,

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

नियीमत कार्यक्रम क्षणचित्रे

शैक्षणिक वर्ष २०२१-२२




करोना पेशंटला आवश्यक रक्त पुरवठा कर.करण्यासाठी रक्तदान शिबिराचे आयोजन. प्रसंगी उपस्थित माजी आमदार श्री पृथ्वीराज साठे, आमदार सुरेश डॉ. नरेंद्र काळे व बबन भैया लोमटे




करोना पेशंटला आवश्यक रक्त पुरवठा कर.करण्यासाठी रक्तदान शिबिराचे आयोजन.  प्रसंगी रक्त दाते व उपस्थित माजी आमदार श्री पथ्वीराज साठे.  आमदार सरेश  डॉ.  नरेंद्र काळे व इतर मान्यवर




महाविद्यालयाच्या  परिसरात  वृक्षरोपण करतांना मा. आ. श्री प्रकाशदादा सोळंके, श्री  डॉ नरेंद्र काळे, श्री दत्ता आबा पाटील प्र. प्राचार्य डॉ धर्मराज तंदुळजेकर




महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षरोपण करतांना प्र. प्राचार्य डॉ धर्मराज तंदुळजेकर, डॉ मुकुंद राजपंखे व प्रा. शैलेश जाधव






२१जून २०२१  रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करतांना स्वयंसेवक व प्राध्यापक




शिवाजी महाराज  यांच्या प्रतिमेचे पूजन करतांना प्राचार्य डॉ धर्मराज तांदूळजेकर  व प्राध्यापक



महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करतांना प्राचार्य डॉ धर्मराज तांदूळजेकर  व प्राध्यापक



महाविद्यालयाचा परिसरात  वृक्षरोपण करतांना म. शि. प्र. मंडळाचे सचिव आ. श्री सतीशभाऊ चव्हाण, प्राचार्य डॉ धर्मराज तांदूळजेकर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व प्राध्यापक




महाविद्यालयाचा परिसरात  वृक्षरोपण करतांना म. शि. प्र. मंडळाचे सचिव आ. श्री सतीशभाऊ चव्हाण, श्री  डॉ नरेंद्र काळे, श्री दत्ता आबा पाटील प्राचार्य डॉ धर्मराज तांदूळजेकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व प्राध्यापक




महाविद्यालयाचा परिसरात  वृक्षरोपण करतांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व प्राध्यापक




योगासन व जलनेती प्रात्यक्षिक करतांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व प्राध्यापक






महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करतांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व प्राध्यापक






मतदार जागृती अभियान रांगोळी स्पर्धेत सहभागी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व प्राध्यापक








महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करतांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व प्राध्यापक




महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करतांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व




महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करतांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व




संविधान दिनानिमित डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करतांना डॉ. नरेंद्र काळे , प्र. प्राचार्य डॉ धर्मराज तंदुळजेकर व प्राध्यापक





महाविद्यालयाचा परिसरात संविधान दिनानिमित संविधानाच्या प्रास्ताविकाचे सामुहिक वाचन करतांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व प्राध्यापक




महाविद्यालयाचा परिसरात  वृक्षरोपण करतांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व प्राध्यापक




पोषण महा निमित्त मार्गदर्शन करतांना डॉ.  प्रशांत दहीरे व प्राचार्य डॉ.  धर्मराज तांदूळजेकर




पोषण महा निमित्त मार्गदर्शन करतांना डॉ. प्रशांत दहीरे व प्राचार्य डॉ. धर्मराज तांदूळजेकर




महाविद्यालयाचा परिसरात  वृक्षरोपण करतांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व






आरोग्य तपासणी शिबिरात तपासणी करतांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व प्राध्यापक






महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करतांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व प्राध्यापक






कोविड लसीकरण शिबिरात सहभागी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व प्राध्यापक





प्रजासत्ताक दिन परेड पूर्व निवड शिबिरात सहभागी राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्वयंसेवक शेख



जळगाव येथील प्रजासत्ताक दिन परेड पूर्व शिबिरासाठी निवड झाल्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्वयंसेवक कु. शेख सना, कुलगुरू डॉ प्रमोद येवले , प्र कुलगुरू डॉ शाम शिरसाठ, डॉ. टी. आर पाटील  व इतर मान्यवर यांच्या समवेत.




ETI प्रशिक्षण शिबिरात बोलतांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रा. डॉ इंद्रजीत भगत




ETI प्रशिक्षण शिबिरात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रा. डॉ इंद्रजीत भगत यांचा सन्मान




पोषण पखवाडा निमित्त कार्यक्रमात सहभागी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व प्राध्यापक




Latitude: 18.723078
Longitude: 76.377559
Elevation: 477.93±107 m
Accuracy: 26.3 m
Time: 12 January 2021 11:45
Note: SAVE WATER SAVE EARTH
Powered by NoteCam


Latitude: 18.722905
Longitude: 76.377226
Elevation: 652.14±1 m
Accuracy: 12.9 m
Time: 08 March 2022 12:18
Powered by NoteCam



संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करतांना प्राचार्य डॉ शिवदास शिरसाठ व प्राध्यापक



जागतिक महिला दिना निमित्त उपस्थित राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व प्राध्यापक




राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व प्राध्यापक मुकुंदराज परिसर स्वच्छ करतांना




राष्ट्रीय सेवा योजना विभाग
Latitude: 18.722716
Longitude: 76.376919
Elevation: 652.14±1 m
Accuracy: 14.4 m
Time: 08 March 2022 11:22
Note: महीला दिन नारीशक्ती गीत गायन स्पर्धा
राष्ट्रीय सेवा योजना यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई शैक्षणिक वर्ष 2020-21
Powered by NoteCam


राष्ट्रीय सेवा योजना विभाग
Latitude: 18.722753
Longitude: 76.376948
Elevation: 652.34±1 m
Accuracy: 14.8 m
Time: 01-08-2022 13:07
Note: मतदार जागृती अभियान रांगोळी स्पर्धा दिनांक 8 जानेवारी 2022
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई
राष्ट्रीय सेवा योजना विभाग शैक्षणिक वर्ष 2021-22  22 व 23/12/2021
Powered by NoteCam


Latitude: 18.722629
Longitude: 76.377082
Elevation: 629.43±51 m
Accuracy: 1.6 m
Time: 07-29-2021 14:25
Note: परिसर स्वच्छता अभियान, राष्ट्रीय सेवा योजना विभाग.
Powered by NoteCam

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

[illegible]





## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

अंबाजोगाई(प्रतिनिधी)- येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शनिवार,दिनांक ५ जून २०२१ रोजी महाविद्यालय परिसरात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ५० वृक्षरोपांची लागवड करण्यात आली.यात कडुनिंब,पिंपळ,गुलमोहर अशी विविध सावली आणि ऑक्सिजन देणारी निसर्ग पोषक झाडांची रोपे याप्रसंगी लावण्यात आली.यावेळी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.धर्मराज तांदूळजेकर,अंतर्गत गुणवत्ता हमी विभागप्रमुख डॉ.मुकुंद राजपंखे,भूगोल विभागातील प्रा.दिलीप कांबळे,संरक्षणशास्त्र विभागप्रमुख प्रा.शैलेश जाधव,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. इंद्रजीत भगत आदींसह इतरांची उपस्थिती होती.याप्रसंगी बोलताना प्रभारी प्राचार्य डॉ.धर्मराज तांदूळजेकर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना वृक्षारोपणाचे महत्त्व सांगितले.एका बाजूला मोफत ऑक्सीजन देणाऱ्या वृक्षवल्लीचे महत्व किती मौलिक आहे याची शिकवण देणाऱ्या जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या ।। वृक्ष वल्ली आम्हा सोयरे ।। वनचरे पक्षीही सुस्वरे आळवीती ।। येणे सुखे रुचे एकांताचा वास नाही गुणदोष अंगा येत ।।१।। या शिकवणीचा विसर ही मानवाला झालेला.परोपकार करणाऱ्या वृक्षाच्या मुळावर घाव घालून मानवाने स्वतःचे अस्तित्व आज धोक्यात आणलेले आहे.जल,जंगल,भूमी मानवाचे मानवाचे भरण पोषण करण्याचे काम करत असते परंतु,भौतिक सुखाच्या मागे धावत असताना निसर्गाची आणि नैसर्गिक साधन संपत्तीची मानवाने अमाप लूट केलेली आहे,ती कुठेतरी थांबली पाहिजे असे ते म्हणाले.तर भावी पिढीला जगण्याचा आधार देणारे काम आज आपण करीत आहोत असे म्हणत याप्रसंगी त्यांनी सर्वांचे कौतुक केले.तर सुप्रसिद्ध गझलकार डॉ.मुकुंद राजपंखे यांनी याप्रसंगी पर्यावरणावर नेमके भाष्य करणाऱ्या आपल्या गजलेतील चार ओळी सादर केल्या त्या अशा अंकुर पौसा आमचा नारा,कोवळ्या चोचींसाठी चारा,चैतन्याचे तोरण येवो,तुमच्या दारा आमुच्या दारा. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.शैलेश जाधव यांनी केले तर प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.इंद्रजीत भगत यांनी करून उपस्थितांचे आभार प्रा.दिलीप कांबळे यांनी मानले.



**भावी पिढ्यांसाठी वृक्ष संगोपन करा-प्रभारी प्राचार्य डॉ.धर्मराज तांदूळजेकर**

हवेतील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वाढत आहे.त्याचा देखील विपरीत परिणाम मानवी जीवनावर होत आहे.परिस्थितीचे गांभीर्य ओळखून वेळीच पावले उचलली गेली नाही तर भविष्यात मानवाला ऑक्सिजन सिलेंडर कायमस्वरूपी सोबत घेऊन फिरण्याची वेळ येऊ शकते.यासाठी ज्याप्रमाणे आपण आपल्या मुलांचे संगोपन करतो त्याप्रमाणे या वृक्षांचे देखील संगोपन करावे अशी मौलिक सूचना प्रभारी प्राचार्य डॉ.धर्मराज तांदूळजेकर यांनी यावेळी केली. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत प्रभारी प्राचार्य डॉ.धर्मराज तांदूळजेकर यांच्या संकल्पनेतून महाविद्यालय परीसरात ५० वृक्ष रोपांची लागवड करण्यात आली असे सांगून ते पुढे म्हणाले की,कुकटात ऑक्सिजन देणाऱ्या वृक्षांचे महत्व किती मौलिक आहे हे आजवर मनुष्याने कधीच गांभीर्याने घेतले नाही.मात्र जीवावर बेतणाऱ्या कोरोना संकटात पैसे देवून देखील ऑक्सिजनची नितांत गरज असणाऱ्या कोरोना बाधित रूग्णांना कृत्रिम ऑक्सिजन वेळेवर मिळत नव्हता.त्यावेळी आपल्याला वृक्षांचे महत्व समजले.वृक्ष लावा,वृक्ष जगवा अशी चळवळ अनेक सामाजिक संस्था मागील अनेक वर्षांपासून राबवत आहेत.मात्र निसर्गाचा बिघडलेला समतोल सावरला जावून,वृक्ष लागवडीला चालना मिळावी यासाठी ही मानवासाठी अनन्यसाधारण आहे असे प्रतिपादन प्रभारी प्राचार्य डॉ.तांदूळजेकर यांनी केले.

दैनिक मराठवाडा साथी
बीड
msathibeed@gmail.com

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

अंबाजोगाई (प्रतिनिधी-) येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले.



मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शनिवार,दिनांक ५ जून २०२१ रोजी महाविद्यालय परिसरात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ५० वृक्षरोपांची लागवड करण्यात आली.यात कडुनिंब,पिंपळ,गुलमोहर अशी विविध सावली आणि ऑक्सिजन देणारी निसर्ग पोषक झाडांची रोपे याप्रसंगी लावण्यात आली.यावेळी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.धर्मराज तांदळजेकर,अंतर्गत गुणवत्ता हमी विभागप्रमुख डॉ.मुकुंद राजपंखे,भूगोल विभागातील प्रा.दिलीप कांबळे,संरक्षणशास्त्र विभागप्रमुख प्रा.शैलेश जाधव,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.इंद्रजीत भगत आदींसह इतरांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.शैलेश जाधव यांनी केले तर प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.इंद्रजीत भगत यांनी करून उपस्थितांचे आभार प्रा.दिलीप कांबळे यांनी मानले.

लोकप्रश्न
8/6/2021

# पर्यावरण दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात वृक्षारोपण

**अंबाजोगाई । वार्ताहर**

येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात शनिवारी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले.मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शनिवार, दिनांक ५ जून २०२१ रोजी महाविद्यालय परिसरात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ५० वृक्षरोपांची लागवड करण्यात आली.

यात कडुनिंब,पिंपळ, गुलमोहर अशी विविध सावली आणि ऑक्सिजन देणारी निसर्ग पोषक झाडांची रोपे याप्रसंगी लावण्यात आली.यावेळी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.धर्मराज तांदळजेकर, अंतर्गत गुणवत्ता हमी विभागप्रमुख डॉ.मुकुंद राजपंखे,भूगोल विभागातील प्रा.दिलीप कांबळे, संरक्षणशास्त्र विभागप्रमुख प्रा.शैलेश जाधव,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.इंद्रजीत भगत आदींसह इतरांची उपस्थिती होती.याप्रसंगी बोलताना प्रभारी प्राचार्य डॉ.धर्मराज



तांदळजेकर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना वृक्षारोपणाचे महत्त्व सांगितले,एका बाजूला मोफत ऑक्सीजन देणाऱ्या वृक्षवल्लीचे महत्व किती मौलिक आहे.याची शिकवण देणाऱ्या जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या ॥ वृक्ष वल्ली आम्हा सोयरे ॥ वनचरे पक्षी ही सुस्वरे आळविती ॥ येणे सुखे रुचे एकांताचा वास नाही गुणदोष अंगा येत ॥१॥ या शिकवणीचा विसर ही मानवाला झालेला.परोपकार करणाऱ्या वृक्षाच्या मुळावर घाव घालून मानवाने स्वत:चे अस्तित्व आज धोक्यात आणलेले आहे.जल, जंगल,भूमी मानवाचे भरण पोषण करण्याचे काम करत असते परंतु, भौतिक सुखाच्या मागे धावत असताना निसर्गाची आणि नैसर्गिक साधन संपत्तीची मानवाने अक्षरश: लूट केलेली आहे,ती कुठेतरी थांबली पाहिजे असे ते म्हणाले.तर भावी पिढीला जगण्याचा आधार देणारे काम आज आपण करीत आहोत असे म्हणत याप्रसंगी त्यांनी सर्वांचे कौतुक केले.तर सुप्रसिद्ध गझलकार डॉ.मुकुंद राजपंखे यांनी याप्रसंगी पर्यावरणावर नेमके भाष्य करणाऱ्या आपल्या गझलेतील चार ओळी सादर केल्या त्या अशा अंकुर पोसा आमचा नारा,कोवळ्या चोचींसाठी चारा,चैतन्याचे तोरण येवो,तुमच्या दारा आमुच्या दारा. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.शैलेश जाधव यांनी केले तर प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.इंद्रजीत भगत यांनी करून उपस्थितांचे आभार प्रा.दिलीप कांबळे यांनी मानले.

# एनआरडी शिविर के लिए राष्ट्रीय सेवा योजना का दल रवाना



**विशेष प्रतिनिधि** | औरंगाबाद

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विश्वविद्यालय, जलगांव में 12 से 21 अक्टूबर तक आयोजित प्री एनआरडी/एसआरडी शिविर के लिए डॉ बाबासाहब आंबेडकर मराठवाड़ा विश्वविद्यालय अंतर्गत आने वाले चार जिलों के 7 स्वयंसेवकों की टीम रवाना हो चुकी है।

टीम में शामिल लोगों में वसुंधरा झाड़गांवकर( छत्रपति महाविद्यालय औरंगाबाद), प्रियंका ठोसरे( एमजीएम जीवाई पाथ्रीकर महाविद्यालय, औरंगाबाद),सना शेख (यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई), अनीता पगारे( आईबीपी महिला महाविद्यालय औरंगाबाद), नाजीम पटेल( मौलाना आजाद महाविद्यालय औरंगाबाद), स्वराज हिवराले( कला महाविद्यालय, बिड़कीन), सुमित जाधव (शिव छत्रपति महाविद्यालय, औरंगाबाद) शामिल हैं। टीम की रवानगी पर इस संघ के स्वयंसेवकों को कुलपति डॉ प्रमोद येवले, प्र-कुलपति डॉ. शाम शिरसाठ, कुलसचिव डॉ. जयश्री सूर्यवंशी, संचालक डॉ टीआर पाटील ने शुभकामनाएं दी हैं।